वाचले:-१) मा.स्थायी समिती सभा ठराव क्रमांक २३१९ दिनांक २६/२/२०१८ या मध्ये दुरुस्ती करणेत आलेली आहे.)
२५०४ दिनांक २८/३/२०१८रोजीचा मंजुर ठराव

२) कार्यासन अधिकारी नगर विकास विभाग महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई ३२ यांना जा.क्रमांक शिक्षण /७ /कावि /६०५/२०१९दिनांक ०२/०७/२०१९ रोजीचे पत्र

३) मा. शिक्षिण समिती सभा ठराव क्रमांक ३८ दिनांक ४/१/२०२० नुसार खालील प्रमाणे मानधन वाढ करणे बाबताचा मंडुर ठराव.

४) कार्यासन अधिकारी नगर विकास विभाग महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई ३२ यांना जा.क्र.शिक्षण विभाग बाल /७/ कावि/९९/२०२१ दिनांक १०/५/२०२१

५) मा.महानगरपालिका सभा ठराव क्रमांक ६७३ विषय क्रमांक ४ दिनांक २०/०८/२०२१रोजीचा उपसुचने व्दारे केलेला मंजुर ठराव

६) मा. आयुक्त सो यांचे कडील दिनांक२३/ ९/ २०२१ रोजीचा मंजुर प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
प्राथमिक शिक्षण विभाग
जा.क्र शिवि/बाल/७/कावि/ २६/२०२१
दिनांक२३/ ०९/२०२१

विषय:- बालवाडी शिक्षिका / सेविका यांना वाढीव मानधन देणे बाबत..

आदेश,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी प्राथमिक शिक्षण विभागामार्फत सन १९८८ पासुन बालवाडी शिक्षिका आजअखेर २०८ बालवाडी शिक्षिका / सेविका मानधनावर कामकाज करीत आहेत. उपरोक्त वाचले क्रमांक १ ते ५ नुसार खालील प्रमाणे बालवाडी बालवाडी शिक्षिका/ सेविका यांचे खालील प्रमाणे मानधन निश्चित करणेस मान्यता दिलेली आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क् | मानधन टप्पा | सद्याचे वेतन | सन २०१४ ते सन २०२० पर्यत एकुण ६ वर्षे होतात | दर २ वर्षानी १० टक्के वाढ केली तर ३० टक्के व २५.१ चे पुढे ६० टक्केवाढ होईल | एकुण मानधन वाढ |
|---|---|---|---|---|---|
| १ | १ ते ५ वर्षे | ७०००/- | ६ वर्षे | २१००/- | ९,१००/- |
| २ | ५.१ वर्षे ते १० वर्षे | ८०००/- | ६ वर्षे | २४००/- | १०,४००/- |
| ३ | १०.१ वर्षे ते १५ वर्षे | ९०००/- | ६ वर्षे | २७००/- | ११,७००/- |
| ४ | १५.१ वर्षे ते २० वर्षे | १०,०००/- | ६ वर्षे | ३०००/- | १३०००/- |
| ५ | २०.१ वर्षे ते २५ वर्षे | ११.०००/- | ६ वर्षे | ३३००/- | १४३००/- |
| ६ | २५ .१ वर्षे चे पुढे | १२०००/- | ६ वर्षे | ७२००/- | १९२००/- |

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, प्राथमिक शिक्षण विभागामध्ये एकुण २०७ बालवाडीवर्ग असुन त्यामध्ये एकुण २०८ बालवाडी शिक्षिका /सेविका मानधनावर कामकाज करीत आहेत.सदर बालवाडी शिक्षिका/ सेविका यांना पुणे महानगरपालिके प्रमाणे एकवट मानधनाच्या १० टक्के व २५.१ वर्षाचे पुढे ६० टक्के मानधन वाढ करणे बाबतचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | बालवाडी शिक्षिका सेवाकालावधी | सद्याचे मानधन | वाढीव मानधन | बालवाडी शिक्षिका संख्या | वाढीव मानधनसह मासिक खर्च | मानधन वाढीसह एकुण वार्षिकखर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २५.१ वर्षे व पुढे | १२००० | १९२०० X | ०४ | ७६८००/- | ९२१६००/- |
| २ | २०.१ वर्षे ते२५ वर्षे | ११००० | १४३०० X | ६८ | ९७२४००/- | ११६६८८००/- |
| ३ | १५.१ वर्षे ते २० वर्षे | १०००० | १३००० X | ३६ | ४६८०००/- | ५६१६०००/- |
| ४ | १०.१ वर्षे ते १५ वर्षे | ९००० | ११७०० X | ८४ | ९८२८००/- | ११७९३६००/- |
| ५ | ५.१ वर्षे ते १० वर्षे | ८००० | १०४०० X | ०९ | ९३६००/- | ११२३२००/- |
| ६ | १ ते ५ वर्षे | ७,००० | ९१०० X | ०७ | ६३७००/- | ७६४४००/- |
| | एकुण | एकुण | | २०८ | २६५७३००/- | ३,१८,८७,६००/- |

उपरोक्त प्रमाणे बालवाडी शिक्षिका / सेविका यांचे एकत्रित मानधनात १० टक्के वाढ दिल्यास बालवाडी मानधन एकुण रक्कम रुपये ३,१८,८७,६००/- अंदाजे इतका खर्च येणार आहे. सद्यस्थितीत बालवाडी मानधन या लेखाशिर्षावर सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षाकरीता रक्कम रुपये ३,००,००,०००/- तरतुद करणेत केलेली आहे. तसेच सदरचे मानधन वाढी मुळे रक्कम रुपये १८,८७ ६००/- अधिकची तरतुद करावी लागणार आहे .

सबब मी आयुक्त,पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी १८ या आदेशान्वये बालवाडी शिक्षिक / सेविका यांना मानधनामध्ये दर दोन वर्षानी एकवट मानधनाच्या १० टक्के व २५.१ वर्षाचे पुढे ६० टक्के वाढ करणेस मान्यता देत आहे. सदर मानधन वाढ ही माहे ऑक्टोंबर २०२१ पासुन अंमलबजाणी करणेत यावी. तसेच सतत गैरहजर बालवाडी शिक्षिका / सेविका यांना कोणतीही वाढ देणेत येवु नये तसेच मानधन अदा करणेत येऊ नये.

२३/०३/२४

( राजेश पाटील )
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी १८.